

देवणी येथील रसिका महाविद्यालयात मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे.

# जनजागृतीसाठी सेल्फी पॉईंट

लोकमत न्यूज नेटवर्क

देवणी : विधानसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढावे, म्हणून येथील रसिका महाविद्यालयाच्या रासेयोच्या वतीने 'मी मतदान करणारच' या सेल्फी पॉईंटची निर्मिती करण्यात आली आहे.

उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे यांच्या हस्ते झाले. 'मी मतदान करणारच' या संकल्प अभियानच्या उद्देशाने स्वाक्षरी फलक लावण्यात आला आहे. त्यावर अनेकांनी स्वाक्षरी करुन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पी.आर. मोरे, डॉ. एस.एस. डेंगाळे, डॉ. वैशाली चटगे, डॉ. सचिन चामले, डॉ. रेणुका कुणाळे, प्रा. अंकुश भास्कर, दीपक पाटील, सुमित मोहिते, संतोष मुळे, दत्ता काकनाळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya
DEONI Dist.Latur

# कै. रसिका महाविद्यालयात मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक





देवणी – कै.रसिका महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने मतदार जनजागृती कार्यक्रमांतर्गत मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. यावेळी देवणी तहसील कार्यालयाचे कर्मचारी पथक प्रमुख श्री. पी. एस. कुलकर्णी मास्टर ट्रेनर श्री. जी. एस. कुलकर्णी मास्टर ट्रेनर पी. एस. गोडबोले व्ही. एम. रोडेवाढ व श्री प्रदीप कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मतदान यंत्राची सखोल माहिती देऊन मतदार यंत्र सोबत व्हीव्हीपॅट वर आपण केलेल्या मतदानाची ची खात्री कशी करून घ्यायची याविषयी सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य शिवाजी सोनटक्के, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. पुरुषोत्तम मोरे व सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमानी यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका ...

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya,
DEONI Dist.Latur

# कै.रसिका महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त वृक्षारोपण



देवणी/प्रतिनिधी : कै.रसिका महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे, डॉ. रेणुका कुनाळे तसेच पंडित दीनदयाल महाविद्यालय देवणी येथील प्रभारी प्राचार्य डॉ. धोतरे बी. एस., मराठी विभाग प्रमुख डॉ. कांत जाधव, शिवाजी महाविद्यालय उदगीर येथील डॉ. ज्ञानोबा मुळे, डॉ. जगताप, डॉ. राहूल ढगे, उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथील डॉ. राहुल अलापुरे, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट येथील प्राणीशास्त्र शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोकराव मुंडे यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै.रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya,
DEONI Dist.Latur

नव्यादिशा
सोमवार, १२ ऑगस्ट २०१९
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
३



# रसिका महाविद्यालयात कोल्हापूर, सांगली पूरग्रस्तांसाठी मदत निधी




**देवणी** : येथील रसिका महाविद्यालयात कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव परिसरात महापुरामुळे अत्यंत विदारक भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे या परिसरातील पूरग्रस्तांसाठी मदत करणे हे आपले कर्तव्य आहे आपण आपल्या बांधवांना संकट प्रसंगी मदत करावी या उदात्त हेतुने देविनी येथले कै. रसिका महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनी सांगली, सातारा ,कोल्हापूर पूरग्रस्तांसाठी मदत निधी जमा करण्यात आला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. पी आर मोरे यांनी आपली मदत आपल्या लोकांसाठी अशी असे आव्हान करून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन केले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर प्रशांत भंडे उपप्राचार्य डॉक्टर शिवाजी सोनटक्के डॉक्टर एस एस पेडगे डॉक्टर मोरे डॉक्टर योगेश मुळे डॉक्टर वैशाली चटगे, डॉक्टर श्रीधर बनसोडे , डॉक्टर रेणुका कुणाळे . डॉक्टर अनुरुद्ध बावरे, डॉक्टर चंद्रशेखर मलबा ,प्राध्यापक अंकुश भुसावळ श्री दीपक पाटील, सुमित मोहिते ,तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सढळ हाताने मदत केली.

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya
DEONI Dist.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका महाविद्यालय देवणी

# रसिका महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा


देवणी - देवणी येथील रसिका महाविद्यालयात २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे हे उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून देवणी येथील तहसीलदार सुरेश घोळवे, गटशिक्षणाधिकारी उज्वलकुमार कुलकर्णी, अंबरखाने ब्लड बँक उदगीर येथील डॉ. शेटकार बी. एस. उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी निसर्ग संवर्धनात युवकांची महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगितले तसेच निसर्ग संवर्धन करण्यासाठी देशी झाडांची अधिकाधिक अधिक लागवड करण्याचे आवाहन केले. तर गटशिक्षणाधिकारी उज्वलकुमार कुलकर्णी यांनी पारंपारिक जीवनशैलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. अंबरखाने ब्लड बँकेचे रक्त संकलन अधिकारी डॉ. बी. एस. शेटकार यांनी रक्तदान सर्वश्रेष्ठ दान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.







कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पुरुषोत्तम मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे गोदावरी व बिरादार ऋतुजा यांनी केले. प्रारंभी डॉ. श्रीधर चनसोडे यांनी एन. एस. एस. गीत गायन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमाणी यांनी केले.

दि. 27/09/2019 वार शुक्रवार

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका महाविद्यालय

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya,
DEONI Dist.Latur

## रसिका महाविद्यालयाच्या वतीने पूरग्रस्तांसाठी मदत

देवणी: रसिका महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सांगली कोल्हापूर भागातील पूरग्रस्तांसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने मदतफेरी काढण्यात आली. यात विद्यार्थी, कर्मचारी व शहरातील नागरिकांनी मदतीसाठी उस्फूर्तपणे दान केले. यातून जमा झालेला ७१५२ रुपयांचा निधी तहसीलदार सुरेश घोळवे यांच्याकडे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे, डॉ. वैशाली चटगे डॉ. गोपाल सोमाणी, दयानंद रणदिवे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

लातूर, मंगळवार, दिनांक ३ सप्टेंबर २०१९

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै. रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya,
DEONI Dist.Latur